तरुण भारत
सातारा
www.tarunbharat.com
₹ ४.०० रविवार दि. २ ऑक्टोबर २०१६ बेळगाव • गोव
सातारा पान ३

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगांव

# कोरेगावात भर पावसात युवा महोत्सव

वार्ताहर
कोरेगाव

कोसळणाऱ्या भर पावसाबरोबर जिल्हाभरातुन आलेल्या कलाकारांनी सादर केलेल्या कलागुणांनी कोरेगावकर चिंब झाले. निमित्त होतं ते शिवाजी विद्यापीठाच्या ३६ व्या सातारा जिल्हास्तरीय युवा महोत्सव आजपासुन कोरेगाव येथील डी. पी.भोसले महाविद्यालयात सुरु झाला.

आमदार पतंगराव कदम यांचे हस्ते युवा महोत्सवाचे उद्घाटन झाले. यावेळी प्रमुख पाहुणे विद्यापीठ विकास मंडळाचे प्रमुख डॉ. डी. आर. मोरे हे प्रमुख अतिथी होते. तसेच अध्यक्षस्थानी रयतचे चेअरमन डॉ. अनिल पाटील हे होते. यावेळी रयतचे सचिव डॉ. गणेश ठाकूर, प्राचार्य डॉ. विजससिंह सावंत यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी आमदार पतंगराव कदम म्हणाले, ग्रामीण भागात रयत शिक्षण संस्थेने शैक्षणिक क्रांती केली आहे. आपल्या गावाकडचा विद्यार्थी सक्षम व्हावा यासाठी सोयी सुविधा पुरवल्या जात आहेत, अशावेळी विद्यार्थ्यांनी रडत न बसता जिद्दीने परिश्रम केले पाहिजे. कला, क्रिडा, साहित्य अशा प्रत्येक क्षेत्रात ठसा उमठवला पाहिजे. युवा महोत्सवाचे व्यासपीठ हे कला कौशल्याच्या विकासासाठी पुरक आहे.

डॉ. डी.आर. माने म्हणाले, देशात तरुणाईची लोकसंख्या ५४ टक्याच्यावर आहे. युवाशक्ती ही राष्ट्रशक्ती असून सुप्त कलागुणांना वाव देण्याचे काम युवा महोत्सवाच्या माध्यमातून केले जाते. नॅकमुळे ग्रामीण भागातील महाविद्यालये युवा महोत्सवाचे आयोजन यशस्वीरित्या करीत आहेत. दरम्यान दिवसभरात कर्मवीर या मुख्य रंगमंचासह तीन विविध रंगमंचावर विविध कलाप्रकार सादर झाले. यंदा ७५ महाविद्यालयांचे संघ दाखल झाले. सुमारे दोन हजार युवा कलाकार एकांकिका, लोकनृत्य, लघुनाटिका, पथनाट्य, वक्तृत्व अशा विविध १३ कलाप्रकार सहभागी होऊन महोत्सवात रंगत वाढवली.


कोरेगावः उद्घाटनप्रसंगी बोलताना आमदार पतंगराव कदम. व्यासपिठावर डॉ. मोरे, पाटील व इतर.